सुरक्षित /असुरक्षित कर्ज

कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड

सर्वात महत्वाच्या अटी व शर्ती

कर्ज क्र.-

कर्जदाराचे नाव -

कर्जदार आणि कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड (सीआयएचएल) यांच्यामध्ये सहमती झालेल्या महत्वाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

**कर्जाचा तपशील**

मंजुर पत्र व कर्ज करारनाम्याच्या वेळापत्रकामध्ये कर्ज रक्कम, व्याज दर (आरओआय), व्याज दराचा प्रकार, कर्ज कालावधी, तारणा (लागू असल्यास त्यानुसार) व परतफेड अटी निर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**शुल्क व आकार (जीएसटी / लागू कर सोडून)**

| अ. क्र. | विषय | शुल्क/आकारणीचे नाव | जेव्हा देय असेल | पुनरावृत्ती | लागू आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षित व असुरक्षित कर्ज | अर्ज शुल्क | अर्ज देताना | एकदा | कर्ज रकमेच्या ४% पर्यंत |
| २ | वैधानिक खर्च (सुरक्षित कर्जासाठी लागू असणारा) | सीइआरएसएआय (मूळ दाखल करताना व सुधारणा) | वितरणावेळी | एकदा | रु. ५ लाख पर्यंत कर्जासाठी रु. ५०/- (प्रत्येक दाखल/सुधारणा) |
| | | | | | रु. ५ लाख पेक्षा जास्त कर्जासाठी रु. १००/- (प्रत्येक दाखल /सुधारणा) |
| ३ | वैधानिक खर्च | मुद्रांक शुल्क | वितरणाच्या वेळी | एकदा | संबंधित राज्यात लागू असेल त्याप्रमाणे |
| ४ | थकबाकी आकार / उशीरा भरणा आकार | अतिरीक्त व्याज / थकबाकी आकार | जमा झाल्याने झालेली वाढ | मासिक | प्रचलित व्याज दरापेक्षा जास्त २४.०० % प्रति वर्ष |
| ५ | रेट स्विच / रूपांतरण शुल्क (स्थिर | रुपांतरण शुल्क | घटना | रुपांतरणा वर | मुख्य थकबाकी (POS) वर ५% + GST पर्यंत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | व्याजदरावर फ्लोटिंग किंवा त्याउलट) | | | | |
| ६ | धनादेश अस्वीकार्य आकार /एनएसीएच /इसीएस आदेश अस्वीकृत | संकिर्ण पावती | धनादेश / आदेश अस्वीकारावेळी | धनादेश अस्वीकार संख्येवर आधारीत | प्रत्येक धनादेश अस्वीकार / इसीएस / स्वयं नावे / एनएसीएच आदेश अस्वीकार रु. ५००/- |
| ७ | दस्तऐवज यादी पुरवणे | संकिर्ण पावती | घटना | सुरुवात केलेल्या ग्राहकासाठी विनंतीनुसार | रु. ५००/- पर्यंत प्रत्येक करार |
| ८ | कर्ज करारनामा व दस्तऐवज परत मिळावा आकार | संकिर्ण पावती | घटना | सुरुवात केलेल्या ग्राहकासाठी विनंतीनुसार | रु. २०००/- प्रत्येक विनंतीसाठी |
| ९ | स्वॅपिंग आकार (इसीएस / एनएसीएच ते पीडीसी) | संकिर्ण पावती | घटना | प्रत्येक विनंतीवर | रु. १०००/- |
| १० | कर्ज रद्द आकार | रद्द करणे आकार | घटना | एकवेळचा आकार | रु. १००००/- प्रत्येक करार |
| ११ | संकलन / वसुली | आकार | घटना | - | प्रत्यक्ष प्रमाणे |
| १२ | कायदेशीर शुल्क | आकार | घटना | - | प्रत्यक्ष प्रमाणे |
| १३ | पत जीवन व सामान्य विम्यासाठी अतिरीक्त प्रक्रिया शुल्क | प्रशासन शुल्क | वितरणाच्या वेळी | लागू असल्यास | रु. २०००/- पर्यंत |
| १४ | खाते पत्रक | संकिर्ण पावती | घटना | प्रत्येक विनंतीनुसार | रु. ५००/- |
| १५ | मुदतपुर्व बंद करणे पत्र | संकिर्ण पावती | घटना | प्रत्येक विनंतीनुसार | रु. ५००/- |
| १६ | पुन्हा मंजुरी शुल्क | संकिर्ण पावती | घटना | प्रत्येक विनंतीनुसार | रु. २५००/- पर्यंत |

**पूर्व - भरणा व मुदतपुर्व बंद करणे आकार (जीएसटी / लागू कर सोडून)**

| दर वर्णन | कराराचा पक्ष | मुदतपुर्व बंद करण्याचे शुल्क | | अंशतः पूर्व भरणा शुल्क |
|---|---|---|---|---|
| | | स्व-निधीने बंद | शिल्लक हस्तांतरणाने बंद | स्व-निधीने बंद |
| बदलता दर योजना (गृहकर्ज) | सर्व व्यक्ती | कोणतेही शुल्क नाही | कोणतेही शुल्क नाही | कोणतेही शुल्क नाही |
| | अगदी १ गैर वैयक्तिक | ५% | ५% | ५% अगाऊ रक्कमेवर मुद्दलावर २५% |
| स्थिर दर योजना (गृहकर्ज) | सर्व व्यक्ती | कोणतेही शुल्क नाही | ५% | कोणतेही शुल्क नाही |
| स्थिर दर योजना (गृहकर्ज) | अगदी १ गैर वैयक्तिक | ५% | ५% | ५% अगाऊ रक्कमेवर मुद्दलावर २५% |
| स्थिर आणि बदलता दर योजना (गैर गृहकर्ज) | व्यक्ती / गैर वैयक्तिक | ५% | ५% | ५% अगाऊ रक्कमेवर मुद्दलावर २५% |

*अर्ध-स्थिर कर्ज (सुरुवातीला स्थिर आणि नंतर बदलता) केसमध्ये मुदतपुर्व बंद / अंशतः भरणा निकष हे त्या दिवशी कर्जाची असणारी स्थिती (स्थिर / बदलती) नुसार लागू होतील.

* अगदी एक गैर वैयक्तिक व स्थिर दर योजना मुदतपुर्व कर्ज बंद केसमध्ये कोणतीही मुद्दल रक्कम जी प्रस्तावित मुदतपुर्व बंद तारखेच्या अगोदर १२ (बारा) महिने पूर्व भरणा केला असल्यास पूर्व-भरणा शुल्क भरावे लागतील, जे कर्ज मंजुरी पत्रामध्ये दिलेल्याप्रमाणे असतील, १२ (बारा) महिने अगोदरच्या कालावधीत भरलेल्या सर्व पूर्ण भरणा मुद्दल रकमेवर आणि मुदतपुर्व बंद रकमेवर आकारले जातील.

(कर्ज करारनाम्यात नमूद केलेल्या आकारऐवजी कलम अ व ब मध्ये नमूद केलेले आकार लागू असतील)

**विमा:** कर्जदार जी मालमत्ता तारण म्हणून देणार आहे ती आणि स्वतःच्या जीवनाचा पुरेसा विमा कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडने कर्ज मंजुर करीत असता सूचित केल्याप्रमाणे उतरवू शकतो. कर्जदार आपल्या इच्छेनुसार विमाकर्त्याकडून विमा उतरवू शकतो. कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडद्वारा दिल्या जाणा-या विम्याच्या अंतर्भावाच्या सेवाचा वापर कर्जदार करु शकतो.

**कर्ज वितरणासाठी अटी :**

कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडची कर्ज (किंवा त्याचा भाग) वितरण करण्याच्या जबाबदारीला खालील अटींची पूर्तता करण्याचे बंधन आहे :

(ए) अंतिम वापर जर इतर गोष्टींबरोबर मालमत्ता खरेदीसाठी होणार असल्यास ती मालमत्ता खरेदी / बांधकाम करण्यासाठी कर्जदाराने स्वतःचे पूर्ण योगदान (सदर मालमत्तेच्या किंमतीतून कर्ज वजा करुन येणारी रक्कम) भरलेले असले पाहिजे, त्यासाठी कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडने दिलेल्या विशेष परवानगीचा अपवाद असेल.

(बी) थकबाकीची कोणतीही घटना (कर्ज करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे) घडलेली नसावी आणि / किंवा असता कामा नये.

(सी) प्रक्रिया शुल्क आणि कॅपिटल इंडिया होम लोन्स, त्यांचे एजंट, कर्मचारी आणि / किंवा सहयोगी यांनी केलेले सर्व आकार, खर्च यांचा भरणा कर्ज वितरणापूर्वी केला पाहिजे.

(डी) कर्जाचे सर्व दस्तऐवज आणि कॅपिटल इंडिया होम लोन्सचे सूचित केलेले इतर दस्तऐवज यांची अंमलबजावणी व वितरण कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या समाधानकारक रचना व स्वरुपानुसार कॅपिटल इंडिया होम लोन्सला केले पाहिजे.

(इ) तारणाची (लागू असल्यास) निर्मिती व परिपूर्णता कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या नावाने अशा रँकिंगमध्ये असले पाहिजे जे कॅपिटल इंडिया होम लोन्सला स्वीकार्य असेल, आवश्यक सर्व भरले पाहिजे आणि तारणाची निर्मिती व परिपूर्णता करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही केली पाहिजे.

(एफ) जामिनदारांनी लागू असलेल्याप्रमाणे हमी कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या नावे केली पाहिजे जी कॅपिटल इंडिया होम लोन्सला स्वीकार्य असेल आणि या संदर्भात त्याची पूर्तता आणि आवश्यक ती कार्यवाही केली पाहिजे.

(जी) मालमत्तेच्या संदर्भातील सर्व मूळ टायटल व मालकीच्या दस्तऐवजासह मंजुर आराखडा, परवानगी, पूर्णता प्रमाणपत्र भोगवटा प्रमाणपत्र जे संबंधित प्राधिकरणाकडून घेतलेले असेल (लागू असल्यास) त्याची प्रत कॅपिटल इंडिया होम लोन्सचे पूर्ण समाधान होईपर्यंत दाखल केली पाहिजे.

(एच) कोणतीही असामान्य किंवा इतर अशी परिस्थिती होता कामा नये की जेणेकरुन कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या एकमेव मतानुसार त्यांना असे वाटले की कर्जदार आणि / किंवा जामीनदार हे कर्ज करारनाम्याची त्यांची जबाबदारी पूर्ण करणे असंभाव्य आहे.

(आय) कर्जदार आणि जामिनदार यांनी कॅपिटल इंडिया होम लोन्सचे संपूर्ण समाधान होईपर्यंत सर्व संमती, मान्यता व परवानगी जी एखादी प्राधिकरण किंवा इतर यांच्याकडून घेतली असेल ज्याची आवश्यकता लागू कायदे किंवा कोणताही करारनामा किंवा दस्तऐवज त्यांना किंवा त्यापैकी कोणालाही बंधनकारक असेल किंवा कोणतीही त्यांची मालमत्ता असेल जी कर्ज मिळवण्यासाठी आणि तारणाची निर्मिती कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या समाधानकारक रचना व स्वरुपात असली पाहिजे.

**थकीत कर्ज वसुलीसाठी पालन केल्या जाणा-या थोडक्यात कार्यपध्दती**

(ए) एक किंवा जास्त थकीत घटना घडल्यास कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड कर्जदाराला लेखी नोटीसीमध्ये घोषित करेल की, मूळ मुद्दल व त्यावरील सर्व थकीत व्याज व कर्जावरील शुल्क जे कर्जदाराने देणेचे आहे, जे करारनामा आणि / किंवा इतर करारान्वये त्यातील अटीनुसार असेल, ज्याचे दस्तऐवज कर्जदार व कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड यांच्यामधील असतील तसेच इतर सर्व शुल्क व देय आणि अशा घोषणेमुळे होणारे थकीत व देय होणारे आणि कर्ज व इतर कर्ज संबंधीत तारण असेल जे लागू करण्यायोग्य असेल, जे करारनामा किंवा इतर कोणताही करारनामा किंवा दस्तऐवज विरोधी असला तरी लागू होईल. एखादी थकीत घटना घडल्यास कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडला राहिलेली संपूर्ण कर्ज रक्कम मागण्याचा अधिकार असेल, त्यामध्ये इतर सर्व शुल्क व व्याज समाविष्ट असेल, त्यासाठी कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार हे कोणतीही हरकत किंवा विरोध न करता सदर कर्ज परतफेड करतील.

(बी) नोटीसीनंतर किंवा मुदत संपल्यानंतर एखादी थकबाकी किंवा घटना घडली तर ती घटना थकबाकी झाली असे समजले जाईल, कर्जदार कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडला त्याबद्दल लेखी नोटीस देईल की थकबाकी घटना किंवा असे घडले असल्याचे त्यात नमूद करेल.

(सी) थकबाकीची घटना झाल्यास कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडला योग्य वाटेल त्या पध्दतीने एखादी व्यक्ती किंवा व्यक्तिंच्या समूहाशी संपर्क करण्याचा अधिकार असेल, जो व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती थकबाकी रक्कम वसुल करुन देण्याच्या दृष्टिने मदत करतील त्यात समावेश आहे परंतु तेवढेच मर्यादित नाही ते कर्जदाराच्या मालमत्ता आणि / किंवा कामाच्या ठिकाणांना भेट देऊ शकतील.

(डी) कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडला कर्ज करारनाम्यात नमूद केलेल्या आणि कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड व कर्जदारामधील दस्तऐवजामध्ये लागू केल्याप्रमाणे आपले सर्व हक्क वापरण्याचा हक्क असेल.

(इ) अंमलबजावणीच्या वसुली प्रक्रियेमध्ये गहाण / तारण याचा समावेश आहे परंतु तेवढेच मर्यादित नाही, गहाण ठेवून घेतलेली मालमत्ता ताब्यात घेणे आणि विक्री करणे, त्यासाठी आर्थिक मालमत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि तारण हित अंमलबजावणी अधिनियम, २००२ (एसएआरएफएइएसआय अधिनियम) अन्वये किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गत सूचित केलेली कार्यपध्दती वापरली जाईल, आणि संबंधीत कायद्यामध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन केले जाईल. थकबाकी वसुल करण्यासाठी कायदेशीर पाऊले उचलण्यापूर्वी कर्जदाराला परक्राम्य संलेख अधिनियम, दिवाणी खटला, एसएआरएफएइएसआय अधिनियम इत्यादी यानुसार सूचना / स्मरणपत्र / नोटीस दिली असेल.

**ग्राहक सेवा :**

कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडशी संपर्क करुन कर्जदार घेऊ शकणा-या सेवेचा तपशील खाली दिला आहे :

| | |
|---|---|
| शाखेला भेट देण्याची वेळ | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.३० वा. सोमवार ते शुक्रवार (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बंद) |
| ग्राहक सेवा संपर्क तपशील | customercare@capitalindia.com हेल्पलाईन क्र.$९१०२२४५०३६००० |

**ग्राहकद्वारा तक्रार करण्याची प्रक्रिया :**

ज्या ग्राहकाला तक्रार दाखल करायची असेल त्याने ती खालील स्वरुपात करावी :

प्राथमिक पातळी :

ज्या ग्राहकांना कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड विषयी तक्रार दाखल करायची आहे, त्यांनी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.३० दरम्यान कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडच्या कामाच्या कोणत्याही दिवशी खालीलपैकी कोणत्याही माध्यमाद्वारे सदर तक्रारीचा संपूर्ण तपशील देऊन तक्रार दाखल करावी :

ए) कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडच्या प्रादेशिक / शाखा कार्यालयामध्ये असणा-या तक्रार नोंदपुस्तका मध्ये तक्रार दाखल करावी.

बी) येथे ईमेल करा : customercare@capitalindia.com

सी) कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडच्या +९१-०२२-४५०३६००० या ग्राहक सेवा क्रमांकावर कॉल करा; किंवा.

डी) कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडला खाली दिलेल्या पत्यावर पाठवाः
कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड
लेव्हल - २०, बिर्ला ऑरोरा
डॉ. ऍनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०३०

द्वितीय पातळीः

तक्रार दाखल केलेलेपासून ७ (सात) कामाच्या दिवसात तक्रार निवारण झाले नाही किंवा प्राथमिक पातळीवर ग्राहकाला केलेले निवारण किंवा प्रतिसाद समाधानकारक वाटला नाही तर ग्राहक तक्रारीला गती मिळावी म्हणून कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या नोडल अधिका-याकडे लेखी स्वरुपात येथे करु शकतो.

नोडल अधिकारी, कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड
लेव्हल - २०, बिर्ला ऑरोरा
डॉ. ऍनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०००३०
फोन नं : +९१-०२२-४५०३६०००
ईमेल : service@capitalindia.com

तृतीय पातळीः

कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या नोडल अधिका-याने द्वितीय पातळीवर दिलेला प्रतिसाद किंवा केलेले निवारण यामुळे ग्राहकाचे समाधान झाले नाही किंवा कॅपिटल इंडिया होम लोन्सच्या नोडल अधिका-याकडे तक्रार मिळालेल्या दिनांकापासून १४ (चौदा) कामाच्या दिवसांचे आत तक्रारीचे निवारण झाले नाही तर ग्राहक राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या नियमन आणि पर्यवेक्षण विभागाच्या प्रभारी अधिका-याकडे अर्ज करु शकतो.

तक्रार निवारण कक्ष
नियमन आणि पर्यवेक्षण विभाग
राष्ट्रीय गृहनिर्माण बँक.
चौथा मजला, कोअर ५ए. इंडिया हॅबिटन्ट सेंटर, लोढी रोड,
नवी दिल्ली ११० ००३.

https://grids.nhbonline.org.in/
ईमेलः crcell@nhb.org.in

वरील अटी व शर्ती कर्जदाराने वाचलेल्या आहेत किंवा कर्जदाराला वाचून दाखवलेल्या आणि कर्जदाराला समजलेल्या आहेत.

कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड द्वारा स्वीकृती

अधिकृत सहीकर्ता कर्जदार

दिनांक